## “गुरू - शिष्य” आणि “शिक्षक - विद्यार्थी” स्वतंत्र व महत्वाच्या संकल्पना

-

- सौ. केतकी नेने - लिमये

“गुरूपौर्णिमा” आणि “शिक्षक दिन” हे दोनही दिवस आपण अनेक वर्ष खूप उत्साहाने साजरे करतो. काळाच्या ओघात कुठेतरी त्यामागची तत्वे विसरली जाऊन ते दिवस “Friendship day” आणि इतर दिवसांप्रमाणे “Happy gurupaurnima”, “Happy Teacher’s Day” असे साजरे केले जातात. आपण गुरूंना किंवा शिक्षकांनाच शुभेच्छा देतो, किती हास्यास्पद आहे ना हे? याचे कारण आपण ती परंपरा बाजूला सारून तो फक्त एक सोपस्कार, एक उपचार, एक पद्धत.. म्हणून त्याकडे बघू लागलो आहोत.

भारतीय संस्कृतीत गुरू व शिक्षक या दोन अत्यंत भिन्न पण तितक्याच महत्वाच्या अशा संकल्पना आहेत. दोन्हीचे स्वत:चे महत्व आहे व दोन्ही संकल्पनांचे स्वरूप खूप भिन्न आहे. शिक्षक हा एक हुद्दा आहे तर गुरू हे शिष्याकडून मिळालेले पद आहे. या संकल्पना स्वतंत्रपणे समजून घेतल्या तर आजच्या जगात गुरू व शिक्षक यांच्यात होणारी गल्लत दूर करता येईल. तसेच शिष्य व विद्यार्थी यांचे आहे.

या लेखाचे आपण तीन भाग करू. या लेखाद्वारे प्रथम भागात गुरू - शिष्य संकल्पना, दुसऱ्या भागात शिक्षक - विद्यार्थी नाते आणि तिसऱ्या भागात आजच्या काळात या संकल्पनांचे स्वरूप याविषयी मी माझे विचार मांडणार आहे.

भारतीय संस्कृतीतील गुरू-शिष्य ही जुनी परंतु अतिशय शास्त्रोक्त परंपरा. जेव्हा सर्व ज्ञान हे मौखिक पद्धतीत जतन केले जात असे व ते त्याच पद्धतीत पुढे नेले जात असे, तेव्हाची ती अतिशय शुद्ध पद्धती. लिखित स्वरूपात कोणतेच ज्ञान नसल्याने ते शिष्यांना अनेक मौखिक पद्धतींनी दिले जात असे. ते मुख्यत: श्लोक स्वरूपात होते. त्यामुळे ते पाठ करायला सोपे जात असे. त्याच्या पाठांतराच्या पण अनेक पद्धती होत्या. सरळ म्हणणे, उलट्याबाजूने म्हणणे वगैरे. ज्यामुळे ते ज्ञान मूळ स्वरूपात रहाण्यास मदत होत असे. यासाठी शिष्याची बौद्धिक क्षमता आवश्यक असते. म्हणून गुरूला शिष्य निवडीचा अधिकार होता. ज्या मुलामध्ये अशा प्रकारे ज्ञान संपादन करण्याची क्षमता आहे, तोच शिष्य म्हणून गुरूगृही जात असे. शिवाय आपण दिलेले ज्ञान चुकीच्या मार्गाने वापरले गेले, तर संपूर्ण समाजाचा विनाश संभवतो, त्यामुळे गुरूवर ही मोठी जबाबदारी असे की त्याने शिष्याला पारखून मगच

Srujana-Ranjan

आपले ज्ञान द्यावे. (अयोग्य व्यक्तीला ज्ञान दिल्याने किती अनर्थ होऊ शकतो याची अनेक उदाहरणे आपण आजच्या जगात बघतो.)

'गुरू' जो लघुला मोठा बनवतो, जो अढळ आहे, ज्याला जीवनाचे तत्त्वज्ञान ज्ञात आहे व तो स्वत: त्यानुसार जगतो आणि त्याला ते संपूर्णपणे पटले आहे. आापल्या शिष्यांबद्दल आपपर भाव न बाळगता किंवा षड्रिपुंना जीवनात स्थान न देता सर्वांना समान वागणूक देणारा, शिष्यांनी गुरूला प्रश्न विचारले तर त्याची समाधानकारक उत्तरे देऊ शकणारा तो गुरू. जसे शिष्यांनी प्रश्न विचारून त्यांना ज्ञानप्राप्ती होते, त्याच प्रमाणे गुरू काही प्रश्न विचारून शिष्याला संकेताने त्याच्या ज्ञानापर्यंत घेऊन जाऊ शकतो. गुरूला अहंभाव नसतो. समाजाचे तत्त्वज्ञान सुरक्षितपणे पुढील पिढीकडे सोपवणे हे त्याचे परम कर्तव्य. गुरू हा शिष्याला निर्मितीक्षमता देतो. या प्रक्रियेत जर शिष्य धडपडला, त्याला आधाराची गरज भासली तर तो आधार देणारा, शिष्याकडून काही चूक झाली तर ती दाखवून ती सुधारण्यास मदत करणारा, स्वत:तील दोष समजून त्याप्रमाणे शिष्याला मार्गदर्शन करणारा - तो गुरू. शिष्याने आपल्यापेक्षा प्रगती करून पुढे जावे यातच गुरूला आनंद असतो.

गुरूचे अनेकविध प्रकार सांगितले आहेत. चन्द्र गुरू, मार्गदर्शक गुरू, चंदन गुरू, स्पर्श गुरू, वात्सल्य गुरू, विचार गुरू, दर्पण गुरू वगैरे सर्व प्रकार बघता एकच लक्षात येते की जीवनातील सर्व सकारात्मक गुण गुरूस्थानी असले तर तो उत्तम गुरू मानावा.

शिष्य ठराविक वयानंतर आपल्या आई-वडिलांचे घर सोडून गुरूगृही रहाण्यास जात असे. शिष्याला ज्ञानसाधनेसाठी संपूर्ण वेळ देता यावा व प्रत्येक शिष्याच्या घरच्या परिस्थितीमुळे त्यांच्या ज्ञानसाधनेत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये हा त्यामागचा उद्देश. गुरू आपल्या शिष्याला संपूर्ण जगण्याचे तत्त्वज्ञान आपल्या कृतीतून व आपल्या शिक्षणातून समजावून देत असे त्यासाठी गुरूचे २४ तासांचे सान्निध्य शिष्यासाठी उपयुक्त ठरू शकत असे. जेव्हा गुरूगृही अध्ययन संपवून शिष्य प्रत्यक्ष समाजात पाऊल ठेवत असे तेव्हा तो या समाजव्यवहारास तयार असावा याची संपूर्ण काळजी गुरूगृही घेतली जात असे. गुरूगृह हेच आपले घर या नात्याने जे आवश्यक व जे एक घरातील सदस्याचे कर्तव्य तेवढे व्यवहाराचे काम सर्व शिष्यांनी करणे बंधनकारक होते. यात शिष्यांच्या ज्ञानार्जनाच्या वेळेची हानी होणार नाही याची खबरदारी गुरूपत्नी व इतर सदस्यांकडून घेतली जात असे. (त्यात गुरूगृही राबवणे ही संकल्पना नाही).

गुरू शिष्य परंपरेत शिष्याने गुरू नाकारण्याचा संदर्भ देखील आहे. म्हणजे शिष्य गुरू पेक्षा श्रेष्ठ म्हणून त्याने ते करावे असा अर्थ होत नाही. परंतु जीवनाचे जे सत्य शिष्य जाणून घेऊ इच्छितो ते त्याला योग्य प्रकारे त्या गुरूकडून मिळत नाही असे जर त्याला वाटले किंवा गुरू षड्रिपुंच्या आधीन झाला तर शिष्य हे करू शकतो इतकाच संदर्भ लावावा.

Srujana-Ranjan

गुरूगृही आपला मुलगा इतकी वर्ष राहिला व त्याने त्याचे अध्ययन पूर्ण केले याची जाणीव म्हणून गुरूदक्षिणा दिली जात असे. गुरूदक्षिणा ही दरवर्षी किंवा मुलगा गुरूगृही जातो त्यावेळी दिली जात नसे. शिष्याने परीक्षा उत्तीर्ण होऊन घरी जाते वेळी ही कृतज्ञता व्यक्त करण्याची सांकेतिक पद्धत. आपल्या मुलाला समाजातील व्यवहारास सक्षम केले यासाठीची व्यक्त केलेली एक कृतज्ञता.

आता वळू या शिक्षक-विद्यार्थी नात्याकडे. शिक्षक विद्यार्थी तशी अलिकडची संकल्पना. जेव्हा विज्ञानाची प्रगती होऊ लागली तेव्हा विषय केन्द्रित शिक्षण देण्यास सुरूवात झाली आणि शिक्षक ही संकल्पना अस्तित्वात आली. गुरूची जी व्यापकता आपण पाहिली ती शिक्षक या संकल्पनेत नाही. तरीही शिक्षकाची स्वत:ची अशी कर्तव्ये आहेत. शिक्षक जो ठराविक विषयाचे मर्यादित ज्ञान देतो. विज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्ञानाचे संकलन करण्याची व ते लिखित स्वरूपात उपलब्ध करण्याची अनेक तंत्रे विकसित झाली त्यामुळे गुरूगृही रहाण्याची गरज संपुष्टात आली आणि शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ अशा संस्थांची निर्मिती झाली. प्रत्येक विषयासाठी वेगळा शिक्षक असतो. प्रत्येक विषयाचा एक अभ्यासक्रम असतो, तो अभ्यासक्रम ज्या व्यक्तीस समजावून सांगता येतो तो त्या विषयाचा शिक्षक बनतो. शिक्षकाला तत्त्वज्ञानाची किंवा जीवनमूल्यांची जाण असलीच पाहिजे असे बंधनकारक नाही.

विद्यार्थी हा देखील विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे ध्येय मनात ठेऊन शाळेत, महाविद्यालयात, विद्यापीठात जातो. बऱ्याच वेळा त्याला त्या सर्व विषयांत गती असतेच असे नाही. त्याला तो विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण केल्यामुळे भविष्यात पुढे शिकायची संधी मिळणार असते किंवा जर त्याने महाविद्यालयीन किंवा विद्यापिठीय अभ्यासक्रम पूर्ण केला तर त्याला चांगली नोकरी लागणार असते इतकेच. जेव्हा विद्यार्थी शाळेतून महाविद्यालयात प्रवेश घेतो तेव्हा त्याच्या आवडीचा विषय घेऊन तो अध्ययन करतो. इतर विषयांचे अध्ययन करण्याची त्याला गरज नसते. या सगळ्याचा उपयोग त्याला मुख्यत: अर्थार्जनासाठीच होतो. यातून तो जीवनमूल्ये शिकत नाही. त्यामुळे शिक्षक-विद्यार्थी ही तशी मर्यादित संकल्पना आहे.

चांगला शिक्षक हा विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अधिक शिकवू शकतो, आपल्या वर्तनातून विद्यार्थ्यांना चांगली जीवनमूल्ये देऊ शकतो, असा शिक्षक हा आपसूकच गुरू पदी असतो. अगदी ताजे उदाहरण म्हणजे आपले माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे आहे. अशा शिक्षकाने दिलेले ज्ञान आत्मसात करण्याची विद्यार्थ्याची क्षमता असेल तर तो विद्यार्थी शिष्य बनतो.

Srujana-Ranjan

विद्यार्थी शाळेत किंवा कोणत्याही संस्थेत प्रवेश घेतानाच त्यासाठीचे शुल्क भरतो व शिक्षक जे शिकवतो त्याबद्दल त्याला मोबदला मिळत असतो. हा निव्वळ व्यवहार आहे. परंतु शिक्षकाने त्याचे कर्तव्य चोख पार पाडले तर विद्यार्थी त्या शिक्षकांना योग्य तो मान नक्कीच देतात.

## आजच्या काळात दोन्ही संकल्पनांचे महत्व

आज आपल्याला या दोन्ही संकल्पना त्यांच्या त्यांच्या ठिकाणी जपल्या पाहिजेत. गुरू-शिष्य आणि शिक्षक-विद्यार्थी दोन्ही संकल्पना योग्य रितीने जपल्या व पुढे गेल्या पाहिजेत.

जेव्हा शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ या संस्था अस्तित्वात आल्या तेव्हा तत्त्वज्ञान आणि कला यांचा समावेश त्यात झाला नव्हता, त्यामुळे त्या परंपरा गुरू-शिष्य स्वरूपातच पुढे आल्या. आजच्या काळाचा विचार केला तर अगदी छंद वर्गापासून ते कलेतील एम्.ए., पी.एच्डी. पर्यंत सर्व स्तरांवर या शैक्षणिक संस्थांमधे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मग अशावेळी या ठिकाणी शिकवणाऱ्या व्यक्तीस शिक्षक, प्रोफेसर म्हटले गेले पाहिजे ना की गुरू. कारण येथे कलेचा संपूर्ण आवाका लक्षात न घेता विशिष्ट अभ्यासक्रम केन्द्रित कला शिक्षण दिले जाते. यात गैर काहीच नाही, परंतु ह्या शिक्षणाला गुरू-शिष्य संकल्पनेत बसवता येणार नाही.

मग शिक्षक आणि गुरू यात नक्की फरक काय? शिक्षक हा त्या विषयाचे तंत्रज्ञान शिकवितो, परंतु गुरू ते ज्ञान समाजोपयोगाकरता कसे व कुठे वापरावे याचे मार्गदर्शन करतो. ज्ञानाचा विपरीत वापर होणार नाही याची खातरजमा गुरू करतो.

कलेचे किंवा अध्यात्माचेच नव्हे तर विज्ञान, गणिताचे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर ज्या विद्यार्थ्याची क्षमता असेल तो त्यातील अधिक ज्ञान मिळवेल, त्यात नवनवीन संशोधन करेल व त्याला या सर्वात मार्गदर्शन करणारी, मदत करणारी व्यक्ती ही गुरू स्थानी असेल. हे खऱ्या अर्थाने गुरू-शिष्य नाते असेल. कारण यात तो शिष्य त्या विषयाची जीवनोपयोगी तत्वे आत्मसात करण्याच्या प्रक्रियेत असतो. या प्रक्रियेत अनेकदा निसर्ग, पुस्तक किंवा एखादी घटनासुद्धा आपल्याला गुरूस्थानी असू शकते.

माझ्या अनेक विद्यार्थिनी मला हा प्रश्न विचारतात की मग गुरूपौर्णिमा आणि शिक्षक दिन कसे साजरे करायचे? ते खऱ्या अर्थाने साजरे करायचे असतील तर त्या दिवशी आपल्या शिक्षकांना/गुरूला वंदन करावे. जर गुरूगृही जाणे शक्य नसेल तर मनोमन त्यांना वंदन करून त्यांनी दिलेले ज्ञान जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने पुढे कसे नेता येईल यासाठी सतत प्रयत्नशील रहावे. आपल्या आचरणातून ते व्यक्त झाले तर तीच खरी गुरूदक्षिणा असेल. धन किंवा वस्तू स्वरूपातील गुरूदक्षिणेपेक्षा ती कित्येक पट मौल्यवान असेल.

Srujana-Ranjan